# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.12.2025** **वारः गुरुवार**

---

•जॉर्डन आणि इथिओपियाच्या यशस्वी दौऱ्यानंतर पंतप्रधान ओमानमध्ये दाखल

•विकसित भारत  जी-रामजी-विधेयकवरीलचर्चेला केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान आज लोकसभेत देणार उत्तर

•भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला वीस षटकांचा चौथा क्रिकेट सामना दाट धुक्यामुळं रद्द

आणि

•राष्ट्रीय राजधानीत वाढत्या वायू प्रदूषणाला आळा घालण्यासाठी दिल्ली सरकारकडून आजपासून 'नो पीयूसी, नो फ्युएल' नियमाची कडक अंमलबजावणी

**<u>पीएमओमान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन देशांच्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात काल संध्याकाळी मस्कत इथं पोहोचले. जॉर्डन आणि इथिओपियाच्या यशस्वी भेटीनंतर दोन दिवसांचा ओमानचा हा दौरा असेल. मस्कत विमानतळावर ओमानचे उपपंतप्रधान आणि संरक्षण व्यवहार मंत्री सय्यद शिहाब बिन तारिक अल सैद यांनी त्यांचं स्वागत केलं. विविध क्षेत्रात भारत-ओमान सहकार्य मजबूत करणं  आणि धोरणात्मक भागीदारी वाढवणं यावर उभय नेत्यांनी चर्चा केली. ओमानचे सुलतान आणि राष्ट्रप्रमुख हैथम बिन तारिक यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान या ओमानला भेट देत आहेत. उभय नेत्यांमध्ये आज चर्चा होईल. दोन्ही देश आज ऐतिहासिक व्यापक आर्थिक भागीदारी करारावर स्वाक्षरी करतील. उभय नेत्यांच्या उपस्थितीत केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आणि ओमानचे वाणिज्य, उद्योग आणि गुंतवणूक प्रोत्साहन मंत्री कैस अल युसूफ करारावर स्वाक्षरी करतील. ओमानची भारताशी कायमस्वरूपी मैत्री आणि दृढ ऐतिहासिक संबंध असून या भेटीमुळं दोन्ही देशांमधील सहकार्याचे नवे मार्ग शोधण्याची आणि या भागीदारीला नवी गती देण्याची संधी मिळेल असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हंटलं आहे.

**<u>व्हीबीजीरामजी</u>**

केंद्रीय ग्रामीण विकास, तसंच कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान आज लोकसभेत “विकसित भारत - जी राम जी विधेयक २०२५”अर्थात विकसित भारत - ग्रामीण रोजगार आणि

आजीविका हमी विधेयका वरील चर्चेला उत्तर देतील. या विधेयकावरील चर्चा पूर्ण करण्यासाठी काल लोकसभेत रात्री उशिरापर्यंत कामकाज झालं. हा कायदा वीस वर्षे जुना असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याची जागा घेईल. या विधेयकाद्वारे विकसित भारत २०४७ च्या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत ग्रामीण विकासाची चौकट स्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रौढ सदस्यांद्वारे अकुशल शारीरिक मेहनतीचं काम करणाऱ्या प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला या कायद्याअंतर्गत प्रत्येक आर्थिक वर्षात १२५ दिवसांच्या वेतन रोजगाराची, वैधानिक हमी दिली जाईल. यामध्ये केंद्र सरकारकडून 60  आणि राज्य सरकारकडून ४० टक्के निधीचा वाटा उचलला जाईल, तर ईशान्य आणि उत्तरे कडील राज्यांच्या बाबतीत हे प्रमाण ९० आणि १० टक्के असेल.

या विधेयका अंतर्गत रोजगाराच्या वेतन दिवसांची हमी १०० वरून १२५ दिवसांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव असल्याचं हे विधेयक लोकसभेत मांडताना शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं. महात्मा गांधींचं स्वयंपूर्ण, विकसित आणि दारिद्र्यमुक्त गावं निर्माण करण्याचं स्वप्न हे विधेयक पूर्ण करेल, असंही ते म्हणाले.

**<u>अणुऊर्जा</u>**

अणुऊर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती विधेयक काल लोकसभेत मंजूर झालं. या क्षेत्रातील सुरक्षितता अधिक भक्कम करणं, दर्जा सुधारणंआणि आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठीच्या यंत्रणा बळकट करण्याची तरतूद याविधेयकात आहे. या कायद्यामुळं २०४७ पर्यंत शंभर गिगावॉट अणु ऊर्जा निर्मितीचंलक्ष्य साध्य होईल असा विश्वास अणुऊर्जा राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनीविधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना व्यक्त केला.. ते म्हणाले...

Byte-Jitendra Singh-Nuclear energy-28 sec

**<u>राज्यमंत्रीमंडळनिर्णय</u>**

निवडणूक अधिनियम १९६१मध्ये सुधारणा करण्याचा अध्यादेश काढण्याला महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळानं काल मान्यता दिली. त्यानुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत उमेदवारी अर्जाबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम ठरवण्यात येईल.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमातल्या तरतुदीनुसार उमेदवारी अर्ज स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारायला नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात याचिका दाखल करता येते. मात्र विविध जिल्हा न्यायालयांमध्ये वेगवेगळ्या कालावधीसाठी अशा अनेक याचिका प्रलंबित राहत असल्यानं निवडणुका कालबद्धरित्या घेणं शक्य होत नाही, त्यामुळं या तरतुदी वगळण्याबाबतचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगानं शासनाला पाठवला आहे. त्यानुसार हा निर्णय घेतल्याचं राज्य शासनाच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे.

राज्यातल्या गड-किल्ल्यांप्रमाणेच राज्य संरक्षित स्मारकांच्या परिसरातील अतिक्रमणं रोखण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णयदेखीलकालच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

**WHO-शिखरपरिषद**

W-H-O अर्थात जागतिक आरोग्य संघटना आणि आयुष मंत्रालयानं संयुक्तपणे आयोजित केलेल्या दुसऱ्या W-H-O जागतिक पारंपारिक औषध शिखर परिषदेचं उद्घाटन काल नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं झालं. कार्यक्रमात संबोधित करताना, आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी पारंपारिक औषधांमधील भारताच्या दीर्घकालीन अनुभवावर प्रकाश टाकला आणि संशोधन, गुणवत्ता मानकं आणि जागतिक सहकार्य मजबूत करण्याचं महत्त्व अधोरेखित केलं. २०१६ पासून सुरू झालेली ही शिखर परिषद जागतिक स्तरावर पारंपारिक औषधांच्या प्रगतीमधील एक महत्त्वाचा टप्पा असल्याचं त्यांनी नमूद केलं.

शिष्यवृत्ती, जागतिक सहकार्य आणि आयुष ग्रिड सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे शिक्षण, संशोधन आणि क्षमता बांधणीद्वारे भारताच्या वाढत असलेल्या आंतरराष्ट्रीय सहकार्याचाही जाधव यांनी उल्लेख केला.
W-H-O चे महासंचालक डॉक्टर टेड्रोस घेब्रेयसस यांनी गेल्या हजार वर्षांतील ज्ञानाला आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी जोडण्यासंबंधी संघटनेच्या वचनबद्धतेची ग्वाही दिली. डॉक्टर टेड्रोस यांनी विज्ञान आणि परंपरा तसंच ज्ञान आणि जिवंत अनुभव यांच्यात पूल बांधण्याचं महत्त्व अधोरेखित केलं.

**आयआयटी-बॉम्बे**

कृत्रिम बुद्धिमत्तेवर चालणाऱ्या डेटा सेंटरसाठी प्रगत कूलिंग सोल्यूशन्स विकसित करण्यासंबंधी भारतीय तंत्रज्ञान संस्था अर्थात आयआयटी-बॉम्बेनं डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर सोल्यूशन्स पुरवणाऱ्या व्हर्टिव्हसोबत भागीदारी केली आहे. भारतीय व्यवसायांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वेगानं वाढत असल्यानं तसंच येत्या काळात ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट्सचा वीज वापर झपाट्यानं वाढण्याची अपेक्षा असल्यानं वाढत्या तापमानाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी हे सहकार्य करण्यात येत आहे. या भागीदारीमधून शैक्षणिक संशोधनाचं रूपांतर उद्योगांशी संबंधित, शाश्वत उपायांमध्ये करण्यास मदत होईल, असं आयआयटी-बॉम्बेचे संचालक प्राध्यापक शिरीष केदारे म्हणाले.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला लखनौ इथं नियोजित असलेला वीस षटकांचा चौथा क्रिकेट सामना काल दाट धुक्यामुळं रद्द करण्यात आला.
मैदानाची अनेक वेळा पाहणी केल्यानंतर, पंचांनी अखेर सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत २-१नं आघाडीवर आहे. मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामना उद्या अहमदाबादमध्ये नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे.

नो-पीयूसी-नो-फ्युएल

राष्ट्रीय राजधानीत वाढत्या वायू प्रदूषणाला आळा घालण्यासाठी सुरू केलेल्या बहुआयामी मोहिमेचा भाग म्हणून दिल्ली सरकार आजपासून 'नो पीयूसी, नो फ्युएल' नियमाची कडक अंमलबजावणी सुरू करणार आहे. पर्यावरण मंत्री मनजिंदर सिंग सिरसा यांनी याबाबतचे निर्देश दिले आहेत.

वैध प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र अर्थात पीयूसी नसलेल्या वाहनांना दिल्लीतील पेट्रोल पंपांवर इंधन मिळणार नाही. तसंच दिल्लीबाहेर नोंदणीकृत बीएस सिक्स व्यतिरिक्त वाहनांना शहरात प्रवेश करण्यास मनाई केली जाईल. दरम्यान लोकसभेच्या आजच्या कामकाजात दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील प्रदूषणावर नियम १९३ अंतर्गत चर्चा होण्याची अपेक्षा आहे. खासदार प्रियंका गांधी वाड्रा, कनिमोळी करुणानिधी आणि बांसुरी स्वराज यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे.

**<u>हवामान</u>**

उत्तर प्रदेशात आज दाट धुक्याचा इशारा हवामान विभागानं जारी केला आहे. येत्या दोन दिवसात हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि ओडिशाच्या काही भागात पहाटे खूप दाट धुक्याची परिस्थिती राहण्याचा अंदाज हवामान संस्थेनं वर्तवला आहे. पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि उत्तराखंडमध्येही अशीच हवामान परिस्थिती कायम राहील. उद्यापर्यंत पश्चिम मध्य प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये थंडीच्या लाटेचा अंदाजही विभागानं वर्तवला आहे.

दरम्यान, २३ तारखेपर्यंत जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये हलका पाऊस आणि बर्फवृष्टीचा अंदाज असून गुजरातमध्ये पुढील दोन दिवसांत किमान तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसनं वाढ होण्याची शक्यता आहे.

दिल्ली-एनसीआरमधील हवेची गुणवत्ता अत्यंत खराब श्रेणीत असून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मते, आज सकाळी ६ वाजेपर्यंत राष्ट्रीय राजधानीचा AQI अर्थात सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक ३५६ नोंदवण्यात आला.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.